आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७ .०० वाजता

२८ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

<u>ठळक बातम्या</u>

- राज्यातल्या सरकारस्थापनेविषयी आज रात्री नवी दिल्लीत भाजपा पक्षनेतृत्वासोबत महायुतीच्या घटक पक्षांची बैठक
- अदानी लाच प्रकरण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब
- विधानसभा निवडणूकीत साडेसात टक्के मतदान कसं वाढलं याचं उत्तर द्यावं, अशी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची निवडणूक आयोगाकडे मागणी
- महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आदरांजली

<><><><>

महाराष्ट्रात सरकरस्थापना आणि मुख्यमंत्री कोण होणार याविषयी निर्णय घेण्यासंदर्भात महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज रात्री नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

<><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज सलग तिसऱ्या दिवशी गदारोळामुळे दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यावर अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांवरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केला. सभागृहाच्या हौद्यात उतरून सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्ष देशाच्या हिताशी संबंधित नसलेले मुद्दे उचलत आहे, असं म्हणत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी, घोषणाबाजी करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या जागेवर परतायला सांगितलं, आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी अदानी समूह लाच प्रकरणी चर्चा घेण्याची विनंती केली. मात्र, राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला.

दरम्यान, वक्फ सुधारणा विधेयक २०२४ वरचा अहवाल सादर करण्याची मुदत २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी ठेवला होता, तो लोकसभेनं संमत केला.

<><><><>

विरोधी पक्षांनी संसदेत गदारोळ केल्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी टीका केली आहे. लोकसभेचे सभापती आणि राज्यसभा अध्यक्ष यांनी परवानगी दिलेल्या विषयावर चर्चा करायला सरकार तयार आहे, असं त्यांनी संसदेच्या आवारात बातमीदारांना सांगितलं.

संसदेमधे सरकारी कामकाजाबरोबरच जनतेशी संबंधित विविध मुद्यांवर चर्चा होणं अपेक्षित आहे असं काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी म्हटलं आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. लोकशाहीचा अर्थ सर्वांना सोबत घेणं असा असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांनी आज लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार रविंद्र चव्हाण यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. चव्हाण यांनी मराठीतून शपथ घेतली.

<><><><>

नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा निर्णय अजून केंद्र सरकारनं घेतलेला नाही, अशी माहिती केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात दिली. खासदार सुरेश म्हात्रे यांनी हा प्रश्न विचारला होता. नवी मुंबई विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ' असं नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं पाठवला आहे. या प्रस्तावाच्या सोबत विधिमंडळानं मंजूर केलेला ठराव सुद्धा आहे, अशी माहिती त्यांनी दिली. संबंधित मंत्रालयांशी चर्चा केल्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळ यासंदर्भात अंतिम निर्णय घेतं, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

राज्यातल्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेत वाढलेलं साडेसात टक्के मतदान कसं वाढलं याचं निवडणूक आयोगानं उत्तर द्यावं, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत केली.

आम्हाला मतदान प्रक्रियाच संशयास्पद वाटत असून लोकांचीही अशीच भावना असल्याचं ते म्हणाले. राज्यात तब्बल ७६ लाख मतं वाढली असून संध्याकाळी साडेपाच ते साडेअकरा या वेळेत कुठे कुठे मतदान सुरु होतं याचे पुरावे आयोगानं द्यावेत असंही ते म्हणाले. महाराष्ट्रात झालेल्या मतदान प्रक्रियेबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांचे पती व अर्थतज्ञ यांनीही संशय व्यक्त केला आहे असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोतिबा फुले यांना आदरांजली वाहणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत. जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचार - कार्यावर आधारित विविध कार्यक्रम विविध संस्था संघटनांतर्फे राज्यात सर्वत्र होत आहेत.

<><><><>

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे दिला जाणारा महात्मा फुले समता पुरस्कार आज दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना प्रदान करण्यात आला. समता परिषदेचे अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या अध्यतेखाली पुण्यात फुले वाड्यात हा कार्यक्रम झाला. आज समतेचा विचार पुढे घेऊन जायची गरज आहे, अशी भावना यावेळी नागराज मंजुळे यांनी व्यक्त केली.

<><><><>

महात्मा फुलेंनी संपूर्ण समाजासाठी केलेलं कार्य आजच्या काळातही सर्वांना प्रेरणादायी असल्याचं प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी केलं आहे. महात्मा जोतीबा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये महात्मा जोतीबा फुले यांच्या तैलचित्राचं अनावरण कुलगुरूंच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते.

<><><><>

पुणे जिल्ह्यात देवाची आळंदी इथं संत ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहला उत्साहात पार पाडला. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत आले होते. यानिमित्त माऊलींच्या संजीवन समाधीवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. त्याआधी आज सकाळी माऊलींच्या समाधीस्थळी आरती आणि दुग्धाभिषेक करण्यात आला.

<><><><>

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत येणाऱ्या आरोग्य सुविधांचा समावेश राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या सुरक्षा कवचात करून त्याची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयाने आज आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजनेचा लाभ १४ कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांना होईल, देशभरातल्या कर्मचाऱ्यांना चांगली आरोग्य सुविधा मिळेल, तसंच प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत जोडलेल्या देशभरातल्या तीस हजारपेक्षा जास्त रुग्णालयांमधल्या सेवांचा लाभही त्यांना मिळेल असं या पत्रकात म्हटलं आहे. उपचार खर्चावर कोणतीही मर्यादा नसेल, तसंच देशातल्या धर्मादाय रुग्णालयांमध्येही या योजनेच्या लाभार्थ्यांना सेवा देण्यात येईल, असंही यात सांगण्यात आलं आहे.

<><><><>

महाराष्ट्र राज्य सरकारच्या ६१ व्या मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिका सादर करायला मुदतवाढ देण्यात आली असून निर्माते २७ डिसेंबर पर्यंत प्रवेशिका सादर करु शकतील असं महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी म्हटलं आहे.

१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर झालेल्या मराठी चित्रपटांच्या निर्मात्यांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी प्रवेशिका महामंडळाच्या **filmcitymumbai.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><>

कोल्हापूर जिल्ह्यात उदगाव इथं आज सकाळी कोल्हापूर सांगली महामार्गावर एक कार कृष्णा नदीत कोसळून झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात एका दांपत्याचा समावेश असून अन्य तीन जण जखमी झाले आहेत.

<><><><>

अमरावती जिल्ह्यात मोर्शी वरुड मार्गावर एक ट्रक आणि पिकअपच्या धडकेत तिघांचा मृत्यू झाला. लाखारा फाट्यानजिक झालेल्या या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला असून इतर सहा जण जखमी झाले आहेत. या अपघातामुळे जिल्ह्यतील अवैध वाहतूकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जखमींवर वरुड इथल्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><>

संपूर्ण देशभरात बालविवाह मुक्त भारत हे अभियान राबवण्यात येत असून धुळे जिल्ह्यातल्या ५० गावांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती सप्तश्रृंगी बहुद्देशीय महिला संस्थेने आज वार्ताहर परिषदेत दिली. या चळवळीत सर्वांनी सहभागी होण्याचं आवाहनही या संस्थेनं केलं आहे.

या अभियानाच्या निमित्ताने हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात मसोड ग्रामपंचायत कार्यालय आणि खानापूर इथल्या विद्यासागर शाळेत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

<><><><>

यशवंतराव चव्हाण यांनी सर्वच क्षेत्रात केलेले काम, आज ही दिशादर्शक असल्याचं डी वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती पी डी पाटील यांनी म्हटलं आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीनं बीडमध्ये वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलतं होते.

<><><><><>

राज्यात पुढच्या ४८ तासांत सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तसंच, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसंच विदर्भातल्या तापमानात सरासरीपेक्षा लक्षणीय घट होण्याचा अंदाज हवामान विभागानं कळवला आहे.

<><><><><>